# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/ ८२६
दिनांक : 19 JUL 2017

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

**विषय :-** व्यावसायिक अभ्यासक्रमात जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यामुळे हमीपत्र सादर करून तात्पुरत्या स्वरूपात प्रवेश झालेलया विद्यार्थ्यांचे प्रवेश पुढे सुरू ठेवण्याबाबत

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/जातवैप्रवेश/२०१७/२२५, दिनांक ६.३.२०१७

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेवेळी विद्यार्थ्याकडे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त नसल्यामुळे जात प्रमाणपत्राच्या आधारे जात वैधता प्रमाणपत्र ३ महिन्याच्या मुदतीत सादर करण्याच्या हमीपत्रावर तात्पुरत्या स्वरूपात (Provisional) प्रवेश दिले जातात. या अनुषंगाने संदर्भाधीन पत्रान्वये मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ, नागपूर येथे दाखल झालेल्या जनहित याचिका क्रमांक ६३/२०१४ च्या अनुषंगाने दिलेले आदेश व शासनाने दिनांक १९.१.२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचना विचारात घेऊन सूचना निर्गमित केलेलया आहेत. अनूसुचित जमातीच्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्राअभावी प्रवेशापासून व इतर लाभांपासून वंचित ठेवण्यात येऊ नये मात्र त्या व्यतिरिक्त अन्य प्रकरणी जात वैधता प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर केले नसल्यास ती मुदत संपताच असे प्रवेश रद्दबातल करण्याचे आदेश प्राचार्यांनी वेळीच त्यांचे स्तरावरून निर्गमित करणे आवश्यक ठरते असे नमूद केले आहे.

सदर निर्देश शासनाच्या धोरणास अनुसरून निर्गमित केले असल्याने प्रवेश रद्दबातल करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या असल्या तरी अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश पुढे सुरू ठेवावेत किंवा कसे याबाबत शासनाच्या समाजकलयाण विभाग आणि आदिवासी विकास विभागाबरोबरच उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून मार्गदर्शन घेण्यात येईल. तोपर्यंत संदर्भाधीन पत्रान्वये दिलेलया **सूचना पुढील निर्देशापर्यंत संस्थगित ठेवण्यात याव्यात. शासनाकडून याबाबत पुढील कार्यवाहीबाबत सूचना प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाहीबाबत कळविण्यात येईल.**

**(चंद्रशेखर ओक,** भा.प्र.से)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

E:\Budage\२०१७-१८\General Correspondence\validity court case.docx